# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००५९१**

**अपिलार्थी श्री. सुहास शंकर सावंत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०२.२०२२**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.११.२०२० | ०५.०१.२०२१ | ०१.०१.२०२१ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १६.०२.२०२१ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २७.११.२०२० अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

*"रायगड शिक्षण प्रसारक मंडळ, महाड जि. रायगड- शिक्षणाधिकारी अलिबाग- शि. उ. सं. मुंबई- शिक्षण संचालक म.रा.पुणे- मंत्रालयामधील शिक्षण विभागाचे संबंधीत कर्मचारी यांचे संगणमताने बेकायदेशीर रित्या बनावट आदेश काढणे- उच्च वर्गाला गैरमार्गाने मान्यता देवून शासनाची फसवणुक करणे इ. प्रकार झाले आहेत.*

*सबब माझे दि. ०४.११.२०२० चे पत्राने मा. राज्यमंत्री महोदय यांचे निदर्शनास आणले आहे. मा. राज्यमंत्री महोदय यांनी दि. ०९.११.२०२० चे पत्राने क्र. ००१०२ उपसचिव, शालेय शिक्षण यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग केले आहे.*

*सबब माझे पत्रावर मा. राज्यमंत्री महोदय यांनी नोंदविलेले शेरे त्याची प्रत मिळावी. तसेच उपसचिव यांनी केलेली पुढील कार्यवाहीची माहिती मिळावी. खाली वर्ग केले असेल तर त्या पत्राची प्रत मिळावी. मुदत दिली असल्यास त्याची माहिती मिळावी."*

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००५९१**

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.०१.२०२१ संलग्न केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०५.०१.२०२१ अन्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

*"आपल्या दि. २७.११.२०२० च्या माहिती अर्जास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या माहिती अर्जात उल्लेखित क्र. ००१०२, दि. ०९.११.२०२० चे पत्र दि. १८.१२.२०२० च्या पत्रान्वये पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात आलेले आहेत. तसेच आपल्या दि. ०९.११.२०२० रोजीच्या पत्रावरील शेरे नोंदवलेली छायांकित प्रत यासोबत जोडलेली आहे."*

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला उत्तर देण्यात आले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, ज्याअर्थी माहिती देण्यात आली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**मुंबई**
**दिनांक : २८.०२.२०२२**

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**